# बृहन्मुंबई महानगरपलिका

## सार्वजनिक आरोग्य खाते,

### माता रमाबाई आंबेडकर प्रसुती गृह, मरोळ, अंधेरी (पूर्व)

<u>जाहिरात क्र. एचओ/ ४५४ /एमआरएएमएच दि. ११.०८.२०२६</u>

विषय:-के/दक्षिण विभागातील सार्वजनिक आरोग्य खात्याअंतर्गत असलेल्या माता रमाबाई आंबेडकर प्रसूति गृह, मरोळ, अंधेरी (पुर्व) येथे सोनोलॉजिस्ट पॅनलवर निवड करण्याबाबत.

के/दक्षिण विभागातील सार्वजनिक आरोग्य खात्याअंतर्गत माता रमाबाई आंबेडकर प्रसूति गृह, मरोळ, अंधेरी (पूर्व) येथील आंतररूग्णांच्या शस्त्रकीयेकरिता सोनोलॉजिस्ट यांची पॅनलवर निवड करण्याकरिता इच्छूक सोनोलॉजिस्ट यांची परिपत्रक क्र. एचओ/१९८१६/आस्था-२ दि. १३.१२.२०२५ अन्वये खाली नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता तसेच अटी व शर्तीनुसार दि. ११.०८.२०२६ ते दि. २५.०८.२०२६ पर्यंत (साप्ताहिक सुट्टी व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी १०.०० वा. ते सायंकाळी १८.०० वा. पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

सोनोलॉजिस्ट पॅनलवरील डॉक्टरांच्या नियुक्तीकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता

१. उमेदवार संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी/ पदविका/ डीएनवी धारण करणारा असावा.
२. पदव्युत्तर पदवी प्राप्त झाल्यानंतर 1 वर्षाचा अनुभव धारण करणारा असावा.
३. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलशी नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.
४. अतिरिक्त अर्हतेचे महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलशी नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र/ नुतनीकरणआवश्यक.

सोनोलॉजिस्ट पॅनलवरील डॉक्टरांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती

१. सोनोलॉजिस्ट पॅनलवरील डॉक्टरांची वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत राहिल.
२. प्रत्येक प्रसुतिगृहात सोनोलॉजिस्ट पॅनलमध्ये कमीत कमी दोन तज्ञ असावेत.
३. बधिरिकरणतज्ञ/ बालरोगतज्ञ/ सोनोलॉजिस्ट पॅनलवरील तज्ञांना चक्राकार पध्दतीने शस्त्रकिया करिता बोलवण्यात यावे.
४. बधिरिकरणतज्ञ/ बालरोगतज्ञ/ सोनोलॉजिस्ट पॅनलवरील तज्ञांचे राहण्याचे ठिकाण हे प्रसूतिगृह/ रूग्णालयापासून शक्यतो जवळ असावे.
५. बधिरिकरणतज्ञ/ सोनोलॉजिस्ट / बालरोगतज्ञनियमित शस्त्रकियेबरोबर तातडीच्या शस्त्रकियेकरिता सुध्दा उपलब्ध असावेत.
६. एकूण ३ बधिरिकरणतज्ञांची/सोनोलॉजिस्ट / बालरोगतज्ञ निवड पॅनलवर केली जईल व अतिरिक्त १ बधिरिकरणतज्ञसोनोलॉजिस्ट / बालरोगतज्ञ यांची निवड प्रतिक्षायादी करिता केली जाईल.
७. पॅनलवर सोनोलॉजिस्ट / बालरोगतज्ञ/ बधिरिकरणतज्ञांच निवड करण्याचे अंतिम निर्णय कार्यकारी आरोग्य अधिकारी, सार्वजनिक खाते यांचे राहील.

सोनोलॉजिस्ट / बालरोगतज्ञ/बधिरिकरण पॅनलवरील डॉक्टरांना देण्यात येणा-या सुधारित दराचा तपशिल

| सोनोलॉजिस्ट पॅनल मानधनाचा तक्ता | | |
|---|---|---|
| **अ. क्र.** | **सुविधेचे नाव** | **प्रस्तावित मानधन** |
| १ | सोनोलॉजिस्ट सेवा (सर्वसाधारण सोनोलॉजी) | प्रत्येक सोनोग्राफी करिता रू. २५०/- |
| २ | सोनोलॉजिस्ट सेवा (अनमोली स्कॅन/कलर डॉपरलर /२ डी एको | प्रत्येक स्कॅन करिता रू. ५००/- |

उपरोक्त नमूद अटी व शर्ती पुर्ण करणा-या इच्छूक सोनोलॉजिस्ट यांनी वैद्यकीय अधिकारी (प्रभारी) माता रमाबाई आंबेडकर, प्रसूति गृह, मरोळ, अंधेरी (पुर्व) यांच्या नावे स्वहस्ताक्षरात आपले अर्ज व कागदपत्रे माता रमाबाई आंबेडकर महानगरपालिका प्रसुतिगृह, मरोळ, अंधेरी (पुर्व) कार्यालयात दि. ११.०८.२०२६ ते दि. २५.०८.२०२६ पर्यंत सकाळी १०.०० वा ते सायंकाळी १८.०० वा पर्यंत पोचतील याची दक्षता घ्यावी.